

**जनजागृती...** जिल्हा विधि सेवा प्राधिकरण व स्वयंसिद्धा महिला मंडळाच्या वतीने कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी महिलांची उपस्थिती होती.

# कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम

## जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाचा महिलांसाठी उपक्रम...

लोकमत न्यूज नेटवर्क

### शिबिरामध्ये विविध विषयांवर मार्गदर्शन...

जिल्हा विधि सेवा प्राधिकरण व स्वयंसिद्धा महिला मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महिलांविषयी कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमात महिलांवरील अन्याय, अत्याचार, हुंडाबळी, कौटुंबिक हिंसा, लिंगभेद या विषयावर न्या. यु.के. गंगणे, ॲड. सुनयना बायस, ॲड. अजय कलशेट्टी, ॲड.एस.व्ही. सलगरे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन व आभार पृथ्वीराजसिंह बायस यांनी केले.

लातूर : महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण उच्च न्यायालय मुंबई यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाच्या वतीने एमआयडीसी परिसरातील स्वयंसिद्धा महिला मंडळ येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी महिलांवरील वाढत चाललेले अन्याय, अत्याचार, हुंडाबळी, कौटुंबिक हिंसा, मुला-मुलींमधील भेदभाव, लिंगभेद या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. अध्यक्षस्थानी स्वयंसिद्धा महिला मंडळाच्या अध्यक्षा स्मिता परचुरे तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा विधि सेवा प्राधिकरणच्या सचिव न्या.एस.बी. कंकनवाडी यांची उपस्थिती होती.

यावेळी यु.के. गंगणे, ॲड. सुनयना बायस, ॲड.एस.व्ही. सलगरे, ॲड. अजय कलशेट्टी यांनी कायदेविषयक मार्गदर्शन केले. यशस्वितेसाठी जी.जी. संगयई, व्ही.जी. ढमाले, जी.आर. पांचाळ आदींसह स्वयंसिद्धा महिला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

Scanned by CamScanner

लोकमत

# हॅलो लातूर

औरंगाबाद, गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२०


**जनजागृती...** जिल्हा विधि सेवा प्राधिकरण व स्वयंसिद्धा महिला मंडळाच्या वतीने महिलांविषयी कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी महिलांची उपस्थिती होती.

पान २



Scanned by CamScanner